महाराष्ट्र शासन
वनविभाग

उपवनसंरक्षक, मध्य चांदा वनविभाग, यांचे कार्यालय मुल रोड, चंद्रपूर
दुरध्वनी क्र 250561/233508-07172 .E-mail :-dycfcentralchanda@mahaforest.gov.in

क्रमांक- कक्ष/सर्व्हे/जमीन/2022-23 / 873 चंद्रपूर, दिनांक :-18/08/2022

**प्रति,**

कार्यकारी अभियंता,
आसोलामेंढा प्रकल्प नुतनीकरण विभाग, क्रमांक १
मुल

**विषय :-** आसोलामेंढा प्रकल्पाचे बुडीत क्षेत्र तथा कालव्याचे कामाकरीता आवश्यक ३१५.७४ हे.आर. वनजमीन वळतीकरण बाबत प्रस्ताव.

**संदर्भ :-** विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक ६४० दिनांक २७/०६/२०२२.

----ooo----

संदर्भिय पत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते की, आसोलामेंढा प्रकल्पाचे बुडीत क्षेत्र तथा कालव्याचे कामाकरीता आवश्यक ३१५.७४ हे.आर. वनजमीन वळतीकरण प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. प्राप्त प्रस्तावाची तपासणी केली असता त्यात खालील प्रमाणे त्रुटी निदर्शनास आले. सदर त्रुटींची पुर्तता करणे करीता प्रस्ताव परत पाठविण्यात येत आहे.

१) बाबवार विगतवारीचे तक्त्यात मौजा बाबराळा येथील ०.७५० हेक्टर वनक्षेत्राचा समावेश नाही.

२) या वनविभागाचे कार्यक्षेत्रातील कालव्याचे कामाकरीता एकुण २०.५३८ हेक्टर आर. वनक्षेत्र बाधीत होणार असल्याने बाधीत वनक्षेत्राची KML फाईल प्रस्तावासोबत जोडण्यात आलेली नाही, तरी २०.५३८ हेक्टर आर. वनक्षेत्राची KML फाईलचे प्रॉपटीमध्ये परीक्षेत्र, उपक्षेत्र, नियतक्षेत्र, गावाचे नाव, सर्व्हे क्रमांक / कक्ष क्रमांक प्रत्येक सर्व्हे क्रमांक / कक्ष क्रमांक निहाय बाधीत वनक्षेत्र दर्शविण्यात यावे.

३) या वनविभागातंर्गत कालव्याकरीता बाधीत वनक्षेत्राचे इंडेक्स मॅप, लोकेशन मॅप, १० किमी. रेडीअस मॅप, गुगलअर्थ इमेज मॅप व कन्हारगाव अभयारण्याचे सिमेपासुन प्रस्तावीत वनक्षेत्र किती अंतरावर आहे या बाबत डिस्टंट मॅप प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

सदरहु पुर्तते करीता प्रस्ताव परत पाठविण्यात येत आहे.

**सहपत्र :-** वरील प्रमाणे

(श्वेता बोड्डु)
उपवनसंरक्षक,
मध्य चांदा वनविभाग,चंद्रपूर

**प्रतिलिपी :-** मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांना माहितीस व आवश्यक कार्यवाहीस सादर.

**प्रतिलिपी :-** विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांना माहितीस व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

(श्वेता बोड्डु)
उपवनसंरक्षक,
मध्य चांदा वनविभाग,चंद्रपूर